# प्रकरण पाचवे

## " मेड इन इंडिया " चा वाङ्‌मयीन अभ्यास

प्रास्ताविक

" मेड इन इंडिया " असे ग्रामीण कादंबरीचे इंग्रजी नाव वाचून वाचक बुचकळ्यात पडतो. आणि या कादंबरीत नक्कीच काहीतरी नवीन सांगितले असावे असा प्रथमदर्शनी अंदाज बांधतो. कादंबरीचे मुखपृष्ठ सूचक ठरते कला, क्रिडा राजकारण चित्रपट अशा क्षेत्रातील दिग्गजांचे चेहरे असलेला. शिवाय आधुनिक भारताच्या आधुनिक साधनांची चित्रे असलेला विचित्र शर्ट एका माणसाने घातलेला आहे. माणसाचे हातपाय अतिशय कृश आहेत आणि त्याच्या चेहऱ्याच्या जागी टी.व्ही. आहे. हा माणूस दुसरा तिसरा कोणी नसून आपल्या आधुनिक भारत देशाचे प्रतिनिधिक व्यक्तिमत्व आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमनाने भारतीय संस्कृती कृश होत निघाली आहे. भारतीय माणसाचा कणा विरघळून चालला आहे. हे त्यातून सूचीत होते.

" कागूद " आणि " सावली " या आनंद पाटील यांच्या लघुकादंबऱ्यांना प्रादेशिक पार्श्वभूमी पश्चिम महाराष्ट्राची आहे. तर " मेड इन इंडिया "ला विदर्भाची पार्श्वभूमी आहे. ही कादंबरी प्रथम १९८१ साली अनुष्टुभ द्वैमासिकातून प्रसिध्द झाली आणि १९८७ साली पुस्तक रुपाने श्रीविद्या प्रकाशनाने प्रकाशित केली.

१९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीत " मेड इन इंडियाचे स्थान लक्षणीय ठरण्याची कारणे अनेक आहेत. त्यातील पहिले कारण म्हणजे " व-हाडी " बोलीतील निवेदन.

१९६० नंतर मराठी कादंबरीच्या क्षेत्रात भालचंद्र नेमाडे यांनी कोसला ( १९६३ ) ही कादंबरी लिहून एक नवे आशयविश्व आणले. कोसलातील परात्मभाव शहरी पार्श्वभूमीवर अविष्कृत झालेला आहे. ही परात्मता लेखक पुरुषोत्तम बोरकर यांनी " मेड इन इंडिया" च्या द्वारे मराठी ग्रामीण कादंबरीत आणलेली दिसते. ग्रामीण कादंबरीच्या

विकासाच्या दृष्टीने हा नवा टप्पा म्हटला पाहिजे. शंकर सारडा, " मेड इन...बद्दल म्हणतात," कोसला मधल्या पांडुरंग सांगवीकरने असेच प्रतिनिधीत्व साठ सालच्या ग्रामीण तरुणांचे केले होते. आणि लोकप्रियतेचे शिखर गाठले होते. सत्याऐंशीमधला राजीव गांधीच्या इलेक्ट्रॉनिक युगातला पंजाबरावही असाच आजच्या ग्रामीण तरुणांचा प्रतिनिधी म्हणून समर्थपणे उभा राहतो. कोसलाच्या पुढच्या पिढीचा तो आदर्श ठरतो"[१]

तथापि केवळ कोसलाच्या पार्श्वभूमीवर " मेड इन इंडियाचे" वेगळेपण तोलता येत नाही. तर तीतील ताजी रसरशीत विनोदपूर्ण भाषा आशयाचे वैविध्य, भारतीय खेड्यांचे झपाट्याने बदलत जाणारे स्वरुप व त्याचे चित्रण, नैतिक घसरगुंडी भ्रष्टाचार अशा अनेक परिमाणांनी कादंबरी वैशिष्टयपूर्ण ठरते.

वरील वैशिष्टयांचा सविस्तर अभ्यास करुन मेड इन...चे वेगळेपण निश्चित करु.

कादंबरीचे कथानक
-------------

" मेड इन इंडिया" या पुरुषोत्तम बोरकरांच्या कादंबरीस कादंबरी म्हणता येईकी की नाही हाच मुळात प्रश्न आहे. कारण कथानक ज्याला म्हणतात ते कथानक तिला नाही. शंकर सारडांनी आपल्या परीक्षणात या कादंबरीचा पुस्तक असा उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात, " प्लॉट व कथानक विरहित अशा पात्रमुखी निवेदनाला " कादंबरी" म्हणताना कोणालाही आपल्या वाङ्मयीन औदार्याची संकल्पना फारच ताणावी लागेल"[२] अशा या पारंपारिक कथा नसलेल्या कादंबरीचे वर्गीकरण करताना सारडा म्हणतात, " हशावर हशे आणणारी, गमतीदार किस्से सांगणारी एका अगदी किरकोळ सूत्रात गोवलेल्या प्रासंगिक घटनांची व निरीक्षणांची मालिका गुंफणारी ही एक गमतीदार गद्याकृती आहे."[३] कादंबरी म्हणून या पुस्तकाचे मूल्यमापन करताना र.ना. ठाकूर लिहितात " या कादंबरीला बंदिस्त म्हणावे असे किंवा सांगावे एवढेही कथानक नाही.

तो उद्देशच येथे नाही. एकूणच विकृतीकडे वाटचाल करणाऱ्या ग्रामीण जीवनवास्तवाचे भेदक दर्शन घडविणारी ही एक अभिनव कादंबरी आहे"[४] डॉ. ठाकूरांनी या पुस्तकास अभिनव कादंबरी म्हणून मान्यता दिली आहे.

अशा या वादग्रस्त असलेल्या कादंबरीचे कथानक पहायला गेल्यास खरोखरच अत्यल्प आहे. ते एका वाक्यातही सांगता येते, ते म्हणजे " खेडी प्रधान भारतीय समाजरचनेची होत चाललेली पडझड, ही पडझड कादंबरीचा नायक पंजाबराव साहेबराव गरसोळीकर पाटील, बी.ए.सरपंच, ग्रामपंचायत गरसोळी खुर्द, हा कथन करतो आहे.

सरपंच पंजाबराव पाटील आपल्या निवेदनातून " गरसोळी खुर्द " या आपल्या गावचे सर्वांगीण दर्शन घडवतात. या दार्शनिक निवेदनातून भारतीय समाजरचनेची पडझड उलगडत जाते. आणि " गरसोळी खुर्द " हे खेडे भारतीय प्रातिनिधिक खेडे ठरते.

पंजाबराव पाटलाच्या घराण्यात परंपरेने सरपंचकी चालत आलेली आहे. एके दिवशी मळ्यातल्या ऐसपैस विहीरीवर पंजाबराव आंघोळ करत असताना त्याचा बुढा म्हणजे सरपंच साहेबराव रुस्तुम गरसोळीकर त्याच्याकडे येतात आणि म्हणतात, " याखेपी तुलेच उभा राहाचा इच्यार हाय अम्चा. बास्ता सरपंच्यबी तूच होशीन. गाव चालोशीन"[५] येथून कादंबरीला प्रारंभ होतो. नाही नाही म्हणत शेवटी पंजाबराव निवडणुकीस उभा राहण्यास कबूल होतो. निवडून येतो आणि सरपंचसुद्धा होतो.

कादंबरीच्या पूर्वार्धात तिला एक गती जाणवते. हा पंजाबराव आपण ज्या गावचे सरपंच होणार आहेत त्या " गरसोळी खुर्दची परिस्थिती सांगत जातो. आपण, आपलं घर, आपले वडील गाव, गावाची राजकीय

परिस्थिती. मांगीलाल शेठच्या कृपेमुळे गावात चाललेला मटका, जुगार व्ही.डी.ओ.या आधुनिक होत चाललेल्या खेड्यांची नैतिकदृष्टया होत चाललेली घसरगुंडी तो उलगडत जातो.

त्रेपन्नाव्या पृष्ठापासून पुढे कादंबरीला कथानकच रहात नाही पंजाबराव काही आठवणी सांगायला लागतो. लहाणपणी कुत्र चावल्याची, मामेभाऊ वारल्याची, घरात भूतकाळात पाळलेल्या कुत्र्यांची, अशा काही आठवणी तो सांगायला लागतो. येथे समीक्षकांनी या कादंबरीचे कादंबरीपण नाकारण्याचे कारण लक्षात येते.

मुळात संवेदनशील असलेला म्हणून राजकारणाचा पिंड नसलेला पंजाबराव आपली विविध मते नोंदवत जातो. होणाऱ्या बायको बद्दलचे मत , नोकरी बद्दल , संपूर्ण गावाबद्दल शैक्षणिक राजकीय परिस्थिती बद्दल आपले मत तो नोंदवत राहतो.

असे निवेदन करताना तो क्रिकेट, गाणी लोकगीते, शायरी, चित्रपट या कलाक्षेत्रांचा आधार घेतो. त्याच्या भाषेत म्हणी, वाक्प्रचार आणि वैदर्भी नावीन्यपूर्ण शब्द यांचा पुष्कळ वापर झालेला आहे.

शेवटी सरपंच झाल्यानंतर दुसऱ्याच वर्षी पंजाबरावाच्या लग्नाचा बार उडतो. आणि तिसऱ्यावर्षी तो एका पोराचा बापही होतो. याच दरम्यान त्याच्या उजव्या कानाला ठणका लागून कानाचे एक ऑपरेशनही होते. या ऑपरेशन मुळे त्याच्या कानाचा ठणका थांबत नाही. त्यामुळे त्याला मुंबईच्या सायन हॉस्पिटलात दाखल व्हावे लागते. तेथे त्याच्याकानावर तीन मेजर ऑपरेशन होतात. त्यात चाळीस हजार रुपये खर्च येतो. वर्षभर दवाखान्यात राहावे लागणार म्हणून तो सरपंचकीचा राजीनामा देतो, पण हॉस्पिटलमधून मधूनच परतावे लागते. कारण गावाकडून बुढ्याने ( वडीलांनी ) आत्महत्या केल्याची तार येते.

दारु आणि जुगारात शेत आणि पैसा गमावल्यामुळे बुढयाने आत्महत्या केलेली असते. यामुळे पंजाबरावला वाईट दिवस येतात. कालच्या सरपंचाला आज गावाकडे उसने पैसे मागावे लागतात. काही भांडवलावर तो गावात किराणा मालाचे दुकान टाकतो आणि कसाबसा संसार चालवायला लागतो. तो म्हणतो " तं.मंग म्या माझ्या आदी अंत विस्मरुन गावात दळालकन् किरान्यांच दुकान खोललं, त्यामुळे आता खाऊन पिऊन सुखी, किंवा खाऊनपिऊन दुखी शेवटी सगळे मनाचे, समाधानाचेच खेळ असल्यावर तुमी कशाले येन्ड समजता हे सर्वात महत्वाचं"[६]

आपला मृत्यू कसा होईल यावर एक भाष्य करुन पंजाबराव आपले निवेदन थांबवतो, कादंबरी येथेच संपते.

व्यक्तिचित्रण

<u>पंजाबराव</u>

पंजाबरावचे संपूर्ण नाव पंजाबराव साहेबराव गरसोळीकर. तो आपली ओळख करुन देताना आपल्या संपूर्ण नावापुढे बी.ए. पदवी लावतो, आणि हुद्दा सरपंच, ग्रामपंचायत - गरसोळी खुर्द, असा हा आधुनिक भारतातील आधुनिक खेड्यांचा सुशिक्षित सरपंच पंजाबराव पिंडाने कवीवृत्तीचा आहे. अस्वस्थ मनोवस्थेचा संवेदनशील तरुण आहे. हे त्याच्या अगदी सुरुवातीच्या उद्‌गारावरुनच लक्षात येते, " पुढे बसलोत धुरजळ मांगे बसलो ते उलाय अन मंधात बसलो त बैलबुजाळ, असा हा माहोल"[७] आपल्या डोक्यातील गोंधळ तो असा व्यक्त करतो.

पण केवळ बुढयाच्या ( वडिलांच्या ) आग्रहाखातर त्याला गावचा सरपंच व्हावे लागते. पंजाबरावच्या घरात सरपंचकी परपरेने चालत आलेली आहे. या परपरेत खंड पडू नये असे बुढयाला वाटते. म्हणून तो

पंजाबरावाला आग्रह करून निवडणुकीला उभा करतो. पण ही मक्तेदारी पंजाबरावला पसंत नाही या मक्तेदारीचा उपहास करताना तो म्हणातो, " माझ्याबाद अशी पाटी माझ्या लाहान भाची - केदारची - लागीन अन त्याच्याबाद माझ्या पोराची आता तुमी म्हन्सान की हे असं कसं त हे काही नवाईची दिवाई नाही आपल्या अथुल्ली शिस्टिमच तशी आहे. त्याले कोन काय करीन"८ या मक्तेदारीच्या विरोधात असूनही तो सरपंचकीच्या निवडणुकीला उभा राहतो. या पाठीमागेचे कारण असे की, " समजा आपण झालो नाही त बुढा तहहयात आहेच.बिराना सरपंच होने नोहे. म्हणाजे याही खेपी गावजेसं होतं तसंच राहीन......आपल्याच्यानं गावाचं विशेष भल होणार नसे पन बुढयापेक्षा त आपण चांगले राहू गावासाठी. आपन टिपकागद होउं या गावाचा नव्या नव्या योजनांच सहर्ष स्वागत करु आपण. आपल्याले कोनं नमस्कार केला नाही तरी चालीन पन फुल ना फुलाची पाकई त होऊ आपन गावासाठी"९ बुढयाच्या सरपंचकीनं गाव सुधारत नाही म्हणून तो सरपंच होण्यास तयार होतो. गावाची सुखदुख टिपण्याचा प्रयत्न करू असे ठरवतो. बुढाच सरपंच राहिला तर त्याची हुकुमशाहीच चालत राहिल असे त्याला वाटते.

बुढा पंजाबरावाला पंतप्रधान करायला सुद्धा तयार आहे. सरपंचापासून पाय-या चढत आपल्या पंजाबला आपण पंतप्रधान करू शकू असा बुढयाला विश्वास वाटतो. फक्त एक पंजाबने बुढा म्हणातो तसे वागायला हवे म्हणाजे, " रातरातभर जागून पुस्तक वाचनं अन डोये फोळू फोळू कविता लेहनं सोळलं पाहयजे...ज्याईचे धंदे त्याईनच करावं.....बामनाईसारख आपन केल त कसं हुईन ?.....ते ना ज्यमे काय म्हन्तो मी ? ते ना ज्यमे.."१०

पण पंजाबरावाला वाचनाचा आणि कवितेचा छंद आहे. तो कादंब-या वाचतो. रेडिओवरील कविता ऐकतो. कधी कधी काव्यात्म बोलतो. लख्ख पडलेलं चांदणं त्याला वेड लावते. रात्र रात्रभर तो चांदण्यारात्रीकडे पहात राहतो. चांदण्या रात्री बद्दल तो म्हणातो, " त अशी दावनीवरची चान्नी रात म्हन्जे माही कमजोरी, गाई-गुराच्या गळ्यातल्या किनकिन वाजना-या घंटया अशा चान्या रातीले होवून राहयत बकग्राऊंड म्युझिक रातभर."[११]

कवीता, कथा, कादंब-यात रमणारा पंजाबराव हस्तीदंती मनो-यात बसून लिहिणा-या लेखकाबद्दल बोलताना काव्यातच बोलतो, " अख्खा जिंदगीत ऐकदाही चिखल्यान झालेली अन आभायात जससा ढिगोला ढागोला दिसला तरी गमबुटासह रेनकोट घालणारी पावलं ग्रंथामागून ग्रंथ लिहितात. पानी ओखल्याचे अन् बरसादी पाहयल्याचे हे पोहचतात सिनिमातल्या तयासरोवरातून नद्या दर्यातून कपके घालून हे वावरतात सेव्हंटी यमयमच्या रस्त्याईवरुन, चौकाचौकातून सुहास्य इस्टमनकलरमध्ये अन ब्लॅक अँड व्हाईटमध्ये असतात आपापल्या घरात कर्फ्युग्रस्त ....."[१२]

रेडीओवरील कविता ऐकून पंजाबरावाची प्रतिक्रिया पहा, " येका झटक्यात रेडिओ बंद झाला माझ्याकडून बस कलेज्या थंडा झाला कविता आयकून. आता काहीच नाही आयकावं असं वाटलं..."[१३]

त्याला आपल्या घराच्या बुरुजावर बसून सूर्योदय आणि सूर्यास्त पहायला आवडतो. असा हा संवेदनशील कवीवृत्तीचा पंजाबराव गरसोई खुर्दचा सरपंच होतो. तो केवळ या त्याच्या वृत्तीला शोभेल असे स्वप्न उराशी बाळगूनच. गावात सुधारणा घडवून आनायची हे त्याचे स्वप्न आहे.

त्याची आणखीही स्वप्ने आहेत. त्याच्या देशाबद्दलची शिवाय काही विचित्र स्वप्नेही त्याला पडतात. कवीवृत्तीच्या लोकांचे एक वैशिष्टय म्हणजे स्वप्ने पहाणे. पंजाबरावाचे आपल्या गावा बद्दलचे स्वप्न पहा", ....और अपना तो इसजमीसे येकही ख्वाब है. इस्टमनकलर ख्वाब. अपने गावके चारोओर और सिरीफ गावही नही तो पूरे हिंदौस्ताभरमें दिखना सबतरफ हराहीहरा पूरा डीपग्रीन फॉरेस्ट... और हरेभरे खेतोमे हर यक्करमे होंगे कमसे कम च्यार आमके झ्याल, नारियल, गुलमोहर.......ये सब हो अल्लाताला मगर काँग्रसीघास और बेशरमके पेड न हो कहीं भी."[१४]

भोवतालचे भ्रष्टाचारी वातावरण, दुस-याचा गळा कापून आपला खिसा भरण्याची वृत्ती, गि-हाईक नाही म्हणून देशी दारूचे दुकान, खाटकाचा धंदा, जुगार मटका बंद पडले पाहिजे. कोणी भांडत नाही म्हणून कोर्ट कचे-या बंद पडल्या पाहिजेत. एका जवळ शंभर तिफना जमीन तर दुसरा भूमीहीन ही आर्थिक विषमता बदलली पाहिजे. पगाराच्या उपर एका नव्या पैशालाही हात लावणे म्हणजे पाप करणे असे समजले जायला पाहिजे, मिनिस्टर सायकल वरुन फिरताना दिसला पाहिजे, ज्याच्या त्याच्या मनात अवघे विश्वची माझे घर झाले म्हणून जगातल्या समग्र फौजा खतम झाल्या पाहिजेत असे एक पंजाबरावाचे स्वप्न आहे. हे स्वप्न जर वास्तवात अवतरले नाही तर तो म्हणतो, " पृथ्वीच्या नाशाजवळच आला आहे असे समजावे.

असा हा पंजाबराव स्वत:शीच जास्त संवाद साधतो, चिंतन करतो. तो आपल्याशीच बोलताना स्वत:च्या उल्लेख - " भाऊ पंजाब" असा करतो. त्याच्या चिंतनाचे विषय कधी आत्मपरीक्षण तर कधी सामाजिक परिस्थिती असे असतात. त्याच्या चिंतनाचा एक नमुना पहा, " म्या म्हटलं भाऊ पंज्याब आच्या जगात काही खरं नाही आपल असं वागनं लोक कुठी चालले आपन कुठी चाललो ? असेच दिवस जात राहयले

त लोक वयखनार नाहीत पुढे आपल्याले " .[१५] दु:खं कोणालाही चुकलेले नाही. ते अपरिहार्य आहे म्हणून दु:ख विरहीत जीवनाची कल्पना करणे म्हणजे केवळ स्वप्न रंजन आहे हे पंजाबरावाचे तत्वज्ञान आहे. ते तो कसे सांगतो पहा, " भाऊ पंज्याब मंग असं का करीनास की हे दुखनंच जर का दवा मानलं तं ? या मुक्याबहय-याईलेच हकीम मानलंतं ? त येकेक दाथर तरी कम कम होत जाईन या अदृश्य पलस्तराचा अन कव्हा ना कव्हातरी ते निखळनंच.....".[१६]

समाजातील तरुणांच्या बद्दल विचार करताना तो म्हणतो, " थोडी अधिक मेहनत घेतलीत याईलेही भरपेट भेटन खायले पन ईभर तयहात पसहयत गप्पाईचे अड्डे टाकत याईन सोडलं पाहिजे त्याशिवाय बदलणार नाही तकदीर याईच्या घरातल्या जर्मलच्या भांड्याईचं ".[१७] तर मानवी जीवनाबद्दल चिंतन करताना तो म्हणतो, " आपुल्याजवळ आपलं असं ओरिजीनल काहीच नसते येका जन्माशिवाय हा समग्र रक्तामासाचा देह येका थैलीत घालोल्या जाते अन थैलीबाहिर आल्यावर दुनियेचे चढत जातात येकेक दाथर त्याईच्यावर दिवसेंदिवस. ....".[१८]

सामाजिक परिस्थिती ही एकूण वाईट आहे. मानखाली घालायला लावणारी आहे. सामाजिक मन हे अजगरा सारखे सुस्त झालेले आहे. ते समोर येईल त्या परिस्थितीला गिळंकृत करुन टाकते. म्हणून सहन करणारं सामाजिक मन चिरंजीव असो असेही त्याचे मत आहे.

अशा या पंजाबरावाला कधी कधी परात्मताही घेरते. तो स्वत:लाच अस्तित्ववादी प्रश्न विचारतो. कधी निराश होतो. आणि काही संगत-विसंगत बोलू लागतो. त्याचा बुढा त्याला निवडणुकीला उभा रहा असे म्हणतो त्यावेळी तो नाही म्हणून सांगताना एक उद्गार काढतो, " शिवाय माझेच माझ्याजवळ अनेक प्रश्न आहेत, त्यात आणखी हया गावकीच्या समस्यांची भर कशाला........ नकोच ते".[१९] उदाहरणार्थ : त्याचा अस्तित्ववादी प्रश्न पहा.

" ईच्चार करो भाऊ पंज्याब आपन कितलूसे हया अगळबंब पसा-यात

आपला पल्ला किती ? पाय कसे ? चालकंशी ? सगळं सगळं जन्मा-पासूनच बळ येकवटून पऊ पऊ त कितीक पऊ आपन ? कुठलोग पऊ येखांद्यातरी चान्नीले शितू की नाही आपलोग"?[20] किंवा " अन् आनखी येक तक्लीफ आहेच सायाची इथं आपल्यामागं चोवीसघंटे गरसोईच्या शीवेतून येयेल येक उपग्रह सतत बिंग फिरत, गरगरत असतेच आपल्या उरात आपर्न कुठंही असो सायाचे हॉटिलात, पार्कात, कॉलिज्यात, चौकात, रस्त्यावर, सिनिमात, मुत्रीत ग्राऊंडवर पन हा जसा गुयाले माकोडा!"[21]

गुळाला माशी चिकटून रहावी तसे हे अस्तित्ववादी प्रश्न आणि त्याची परात्मता, नैराश्य पंजाबरावला चिकटून आहे. या जगात आपण क्षुल्लक आहोत. आपण असलो काय अन् नसलो काय मग आपल्या असण्याचा अर्थ काय हे प्रश्न त्याला भेडसावत आहेत आपल्या जगण्याबद्दल तो म्हणतो, " नाहीतरी आपन मुतात मासोया मारून राहयलो हे जगाले दिसतेच आहे......आपला रस्ता बंद असनं काय की चालू असनं काय ? निव्वळ दरियात खसखस "[22] अशा मुडी स्वभावाच्या पंजाबरावाला गावाने " घनचक्कर " असे टोपणनाव दिले आहे. ग्रॅज्युएट असलेल्या पंजाबरावाला जी परात्मता आलेली आहे. त्यामागे आपली स्वत:ची आणि सामाजिक बेकारीही कारणीभूत आहे. या नैराश्यातून तो कधी कधी विसंगत बडबडतो. गावातल्या हायस्कूलात त्याला जावून सांगावे वाटते माझा फोटो काढा आणि लावा वर्गात. पण एक अट अशी की माझ्या नाकातोंडात जाणारं पाणी त्या फोटोत दिसले पाहिजे याचा अर्थ बेकारीच्या भीषणतेचे जे पाणी आहे ते पाणी त्या फोटोत दिसले पाहिजे. माझ्या भोवतीच्या परिस्थितीला जो लकवा मारला आहे. तो ही त्या फोटोत दिसला पाहिजे. अन हे त्यांचं म्हणणं स्वीकारले तर सगळी शाळाच त्याच्यासारख्यांच्या फोटोंनी भरून जाईल इथं पंजाबरावाला शिक्षणाची निरर्थकता स्पष्ट करायची

आहे· त्याचे बोलणे जरी विसंगत वाटले तरी त्यात एक सत्य दडलेले आहे· त्याचे हे वागणे अपरिहार्य आहे असे तो म्हणतो· पहा, " मला खेद आहे दोस्तमित्रहो,सोयरेधायरेही की मी तुमाले जसं पाहयजे तस जगू शाकत नाही"[२३] त्याच्या विसंगत बडबड्याचा आनखी एक दाखला पहा, " हे जागतिक बँकेच्या कर्जानं खनेल इंड्यिन विहीर··· बरसादीत तिच्यात तीनच्यार हजार बेंडक्या·····ड्राव ड्राव कर्तात की काळठाये बसावं· हा ठेकेदारही बेंडकी झाला पाहयजे येकदिवस ·····अन विहीरीत बसला पाहयजे" ड्राव ड्राव करत त्याले हेच पनिशमेंट![२४]

सुखाला आणि दुःखाला समान मानणारा पंजाब एका तटस्थ आणि मिश्किलपणे आपली विविध मते मांडत जातो ही मते वाचताना वाचक कधी खळखळून हसतो तर कधी अंतर्मुख होतो· त्याची विविध मते थोडक्यात पाहू· लग्न करून बायको घरी आणणे म्हणजे त्याला पन्नास साठ किलो मटन घरी आणण्यासारखे वाटते कारण भारतीय तरुण; स्त्रीला स्वातंत्र्य दयायला तयार नाही हे त्याला चांगले माहित आहे. म्हणूनच तो असे मत व्यक्तवतो· नोकरी बद्दल आपले मत मांडताना तो म्हणतो, " गा साहेबाचरनी आपुला माथा टेकोनिया होता जन्मभर त मग कुठ सोन्याचा घास भेटते."[२५] आपल्या गावातल्या फटुया बद्दल त्याचे गमतीदार मत पहा, " गरसोई भवताल फपूळल्याचे असे लोटच्यालोट गगनी झेपावतात, की अमेरिकन उपग्रहानं घेतलेल्या फोटोतून हे शंभर टक्के सिध्द व्हावं, की केला इंड्यानं दुसरा अन्व-स्त्रस्फोट!"[२६]

शैक्षणिक परिस्थितीवर भाष्य करताना तो म्हणतो शिकलेली पोरं आपली शहरात काही किंमत झाली नाही आणि गावातही होत नाही म्हणून निराशा होवून एक एक दिवस दारु पिवून ढकलत राहतात· गावात अशी कितीतरी पोरं आहेत· त्यामुळे गावातल्या लोकांना शिक्षणाबद्दल भीती वाटत आहे· म्हणून ते आता पोरांना

जास्त शिकवत नाहीत हे सांगताना पंजाबराव म्हणतो, " की ते आता आपल्या संततीले गावातल्या हायस्कूलात कामचलावू अक्षरज्ञान शिकवतात अन त्याईले थोडं फार लिहिताबाचता याले लागलं की जास्तीचं शिक्वा-च्या फंदात न पडता डायरेक वावरात मिळोतात. नाहीतं वडिलोपार्जित काम धंद्याले लावतात......"२७ काहीशी गमतीदार वाटणारी पंजाबरावाची मते अतिशयोक्त असली तरी त्याला वास्तवाचा आधार ही आहे.

पंजाबराव अख्या कादंबरीभर आपली भलीबुरी मते नोंदवत राहतो. आणि शेवटी नियतीने लादलेली कंगाली, तितक्याच मिश्कीलपणे स्विकारतो, आपला मृत्यू कसा होईल याचे तटस्थ वर्णन करून तो बोलायचा थांबतो.

## बुढा

बुढा उर्फ साहेबराव रुस्तुम गरसोईकर पाटील, माजी सरपंच म्हणाजे नायक सरपंच पंजाबराव पाटील यांचे वडील. पंजाबचा नसला तरी बुढयाचा पिंड मात्र राजकारण्याचा आहे. त्याला परपंरेने घराण्यात चालत आलेली सरपंचकी तहहयात त्याचीच रहावी असे वाटते. म्हणून तो आपला मुलगा पंजाबराव याला निवडणूकीला उभे राहण्याचा आणि सरपंच होण्याचा आग्रह करतो पण पंजाबरावाला राजकारणाच्या भानगडीत पडायचे नाही म्हणून तो मनोनिग्रहाने " नाही " म्हणून बुढयाला सांगतो. पण बुढा महा वस्ताद आहे. तो आपले सगळे सामर्थ्य पणाला लावून आणि अनुभवाचा वापर करून पंजाबरावला पटवून देतो. तो पंजाबरावाला कळकळीने म्हणातो, " नाही कोन्तीतं इतलीतं गोष्ट आईक माहीकी जवा पहाव तवा आपल्याच मतानं बंडी हकालतं लेका आमी जलम देल्ला तुले. त तू जिंदगीत येक त बानी खरी कर माही. आता तो केदार पकला वशांचा ..नाहीत तुला इतल्या मिंता केल्याही

नस्त्या म्या.[२८]

बुढयाची पंजाबरावाकडून खूप अपेक्षा आहे. त्यानं रात्रभर जागून डोके फोडून पुस्तक वाचणे आणि कविता लिहणं बंद केलं पाहिजे असा जर तो वागला तर बुढयाला त्याला पंतप्रधान करण्याची इच्छा आहे. आणि आपला मुलगा जर पंतप्रधान झाला तर आपली समाधी गांधी -नेहरूंना खेटूनच बांधली जाईल असे त्याला वाटते. पण सगळ्यांनी त्याच्या मनासारखं वागलं पाहिजे, " सा-यांचं हे सरकल माझ्या मनासारखं वागलं ना, त मंग मी गांधी नेहरूले खेटूनच माही समाधी बांधतो. अन.......आपल्या गरसोईपासून त थेट दिल्लीलोग निरा शंभराईच्या थप्प्याच लावतो अन त्या थप्पाईवरून चालत जातो करना सिधासाट दिल्लीले".[२९]

बुढयाच्या मनासारखे होतो तोपर्यंत सर्व काही ठिक असते. पण जर त्याच्या मनाविरूद्ध एखादी गोष्ट घडली तर मात्र काही खरे नाही. त्याच्या अशा मानी स्वभावाचे दोन दाखले या कादंबरीत येतात. एकदा कोणातीतरी लस टोचायला एक डॉक्टर पावसाळ्यात गरसोईत आला. जीवनात पहिल्यादांच तो गरसोईत आला असल्याने गावचा सरपंच कोण हे त्याला माहित नव्हते. त्यामुळे रामराम करायचाही प्रश्न नव्हता. या डॉक्टरने समोरून जाणा-या बुढयाला म्हणजे सरपंचाला काही नमस्कार केला नाही. त्यामुळे बुढा बिघडला. त्यावेळी बुढा पिवून होता. त्यामुळे जास्तच बिघडला. पंजाबराव बुढया बद्दल सांगताना म्हणतो, " चारचौघातल्या येव्हळ्या इन्सल्टवर त माझ्या बुढा खूनच पाळते करना".[३०] असा बुढा डॉक्टरला ओढत आणायचे फर्मान सोडतो आणि आणल्यावर त्याला हात मोडे पर्यंत मार देतो.

बुढयाच्या अशा वागण्याने गावाचा फारसा विकास झालेला नाही. तो डॉक्टर गावाला कायमचाच रामराम ठोकतो. डॉक्टरप्रमाणे

अनेक सरकारी योजनांनीही गरसोईला रामराम ठोकलेला आहे. कचे-यातील आपली कामे करून घेण्यासाठी साहेबलोकांना पार्ट्या दयाव्या लागतात, काही सभा समारंभ तो पार पाडतो हे पाहून पंजाबराव म्हणतो की हे सगळं कशाला करावे लागते? तर त्यावर बुढा म्हणतो, " येकडाव का याईले अर्माननं अलमस्त केलं की मंग याईच्या केबिनीत सीधेसाट घुसा, की हे तटकन उठून तुमाले बसाले खुर्ची देतात. च्याहा पाजतात. काय काम कहाकल ते इच्चारतात."[३१] नाहीतर ढुंकूनही पहात नाहीत.

बुढा जसा रागीट आहे तसाच तो उदार आणि प्रेमळ सुध्दा आहे. गावात त्यानं कोनाला काही कमी केलं नाही. त्याच्या उदार स्वभावाबद्दल पंजाबराव म्हणतो, " बुढयाले तसा वाघाचा कलिज्या अन् हा कलिज्या येकदा का पटला की मंग तो सबन गावाची लेव्ही येकटाच देते. घरातलं सोनं मोडून गावातल्या रस्त्याईवर मुरूम आनून टाकते!"[३२] कोन आडीनडीला आले तर त्याची गरज भागवतो, पैसे तर पैसे देतो कोणी आजारी पडले तर औषधपाण्याची व्यवस्था करतो. जास्तव झाले तर स्वत:च्या खर्चानि अकोल्याला नेऊन खाजगी दवाखाण्यात अॅडमिट करतो. इतका उदार स्वभाव बुढयाचा आहे.

गावातल्या प्रत्येकाने आपल्याला रामराम करावा या बरोबरच गावात आलेल्या कोणात्याही पावण्याने आपल्या घराला भेट दिलीच पाहिले अशीही त्याची अट होती. एखादा पाहुना जर परस्पर गेला तर त्याच्या यजमानाची धडगत नाही. त्या यजमानाला बोलावून तो चांगलाच धारेवर धरे, " ससरीच्या लय आंगात आली काय बाबू तुझ्या? ....लय मस्ती आली नाही?.......तुझ्या मायचा कानकोंडा मारो त मी....."[३३] बुढयाचा गावावर वचक भारी होता त्यामुळे गावाने त्याचे टोपण नाव हिटलर असे ठेवले होते.

तो पंजाबरावाला मुली पाहण्यासाठी जातो तेव्हा तो परस्परच मुलींना नकार देतो. मुलाला त्याबाबत विचारत नाही. पण कित्येक मुलींचे बाप त्याला नकारच देतात. तो आपल्या श्रीमंतीची कल्पना देतो तरी पंजाबराव म्हणतो माझ्या आजोबांना महारोग होता त्याच्या मुळेच कोणी मुलगी द्यायला तयार नाही.

पंजाबराव नोकरी करण्याचा विचार बुढयाला बोलून दाखवतो कारण मुलीचे आईबाप मुलगा नोकरदार असावा अशी अपेक्षा करतात. म्हणून पंजाब बुढयाकडे लाच देण्यासाठी पैसे मागतो. तेव्हा बुढा म्हणतो, "... या कामी आपल्याले कक्कू मांगू नोको अन् सोन्याचा घास जरी खायाले असला तरी नवकरी म्हजे जोके पुसनंच त असं सोनं आपल्याले नोको"[२४] असे त्याचे नोकरी बद्दल मत आहे.

बुढयाला अधेमधे दारु पिण्याची सवय होती. पण पुढे त्याचे दारुचे व्यसन वाढते याला कारण सांगताना निवेदक म्हणतो, " या दोन कोसावरच्या थर्मल पॉवर स्टेशनच्या केमिकलयुक्त सांडपान्यानं आमच्या गावशिवेतल्या शेकडो यक्कर जमिनीले धीरे धीरे चोपन, नापीक बनवलं"[२५] देशाच्या आधुनिकीकरणाचा फटका बुढयाला बसतो. त्याची शेती कारखान्याच्या केमीकलयुक्त पाण्याने नापीक बनते. याशीही तो झगडतो. घरातले सोने नाणे मोडून तो शेती करतो परंतु घाटा पडतो. या दु:खामुळे तो चोवीसतास पिऊ लागतो. त्यातच त्याला सट्टयाचा नाद लागतो. शेवटची चाळीस एकर जमीन तर तो एका रात्रीत गमावतो. एका डावाला एक एक्कर. पण तो सट्टयात काही न मिळवता हारत जातो. या अपयशापोटी तो दारुच्या नशेत " यन्ड्रीन" घेवून आत्महत्या करतो.

पंजाबरावाच्या निवेदनातून स्पष्ट होणारे " बुढया" हे पात्र वैशिष्टयपूर्ण स्वरुपात साकार झाले आहे.

काही इतर व्यक्ती चित्रणे

अ) मांगीलालसेठ :-

निर्व्यसनी मांगीलालसेठ त्यांच्या इलाख्यातून चाळीसएक वर्षापूर्वी गरसोळीत आलेला आहे. त्यावेळी त्याच्या हातात फक्त एक लोटा होता. स्वातंत्र्यानंतरच्या काळात त्या लोटयाची त्यानं घागर केली म्हणजे प्रगती केली. मांगीलालसेठचे गरसोळीत मोठे हॉटेल आहे. त्याच्या हॉटेलच्या शटरखालून आत पाऊल टाकल्या टाकल्या सनमायकाच्या शुभ्र गल्ल्यावर एक काळाभोर टेलिफोन दिसतो. त्या फोनच्या मागे झुलत्या खुर्चीवर तो बसलेला असतो. मांगीलालसेठचा दुसरा हुद्दा म्हणजे रतन खत्री युनिव्हर्सिटीचे व्हाईस चन्सलर. मांगीलाल सेठ म्हणजे उद्योगपती आहे.

त्याच्या तब्येतीचे वर्णन पहा, " अहोरात्र स्निग्ध पदार्थ खाऊन खाऊन, अळमाप खाऊन पगरल्यावानी ढ तबीयत. चांदुरी गुयाच्यावानी कांतीकलर अन भेल्यावर भेल्या साताठभेल्या असा शारीरिक क्षेत्रफळीय उपक्रम म्हणजे मांगीलाल सेठ"[३६] ऑलराऊंडर म्हणून त्याचीइलाख्यात प्रसिध्दी आहे. नाम मोठं आणि दर्शनही मोठं तो खूप श्रीमंत आहे. त्याच्या गळ्यात दुहेरी चेन आणि बोटात चांदीच्या दोन मुंद्या ( अंगठ्या) आहेत.

मांगीलाल सेठचा हॉटेलबरोबर मटका, जुगार, व्ही.डी.ओ., कन्ट्री लिकर, यांचाही धंदा चालतो, गरसोळीची परिस्थिती बिघडली आहे. त्यात महत्वाचा वाटा मांगीलाल सेठचा आहे. शेतकरी शेतात जायला तयार नाही. लवकर उठायला त्यार नाही. मुलांच्या लैंगिक ज्ञानात भर, सिनेमाचे डायलाग तोंडपाठ. ही सगळी त्याचीच कृपा आहे. त्याने टेलिफोन घेतला आहे तो केवळ मटक्याचा आकडा ओपन-क्लोज कळावा म्हणून.

मांगीलाल सेठने गरसोळीत आपला पसारा अत्यंत अक्कल हुशारीने वाढवला आहे. कारण बांधावरचा " ढेकूळ " इकडे-तिकडे सरकला म्हणून ज्या गावात खून होतात त्या गावात इतकी संपत्ती जमवणे साधी गोष्ट नव्हे. हे सगळं त्यानं सगळ्यांशी गोड बोलून, वेळ पडली तर पाय धरून उभा केले. आपल्या सात पिढयांना पुरेल इतकी संपत्ती जमा केली आहे.

कलर टी.व्ही. घ्यायला त्याच्या जवळ पैसे नव्हते असे नाही पण तरीही त्यानं ब्लॅक व्हाईट टी.व्ही. घेतला कारण त्याला माहीत आहे की तो प्रेस्टीज पॉईंट आहे. तेथे गडबड करायची नाही.

फक्त शेठच गावाला लुबाडतो असा त्यातला भाग नाही. इलेक्शन आल्या की मांगीलाल शेठ गावाकडून लुबाडला जातो. आजपर्यंत कित्येक वेळा तो गावच्या निवडणुकीत उभा राहिला पण कधीही निवडून आलेला नाही. निवडणुकीचा फार्म भरायच्या वेळी त्याला अनेकजण आग्रह करतात म्हणून तो फार्म भरतो. पण त्याला मते मात्र कोणी देत नाही. निवडणुकीच्या धामधूमीत त्याच्याकडून पैसा उकळला जातो. आणि शेवटी नेहमी प्रमाणे शेठ आपटतो.

वार्डात धड हजार मतदार नसतात पण गाववाले त्याला साठहजार हॅंडबिल छापायला लावतात. ही हॅंडबिले नंतर गावाच्या अनेक कामासाठी उपयोगी येत राहतात. असा हा मांगीलाल सेठ गावच्या परिवर्तनामधील महत्वाचा घटक आहे.

ब) <u>नथ्थूला</u>

नथ्थूला हा पंजाबरावचा घरगडी आहे. पंजाबरावाच्या घरातील गडी होण्यापूर्वी त्याचा खूप प्रवास झालेला आहे. त्याला सिनेमाची खूप आवड आहे. हा शौक पंजाबरावच अधूनमधून त्याला सिनेमा दाखवून पुरा करतो.

नथ्थूचा वेष कायम, एकटांगी धोतर, अंगात बंडी आणि डोक्याला कायम छापी असा असतो. त्याचा आवाज आणि बोलणं बायकी आहे. सगळं गाव नथ्थूला मामा म्हणून चिडवत असे त्याच्या लहानपणीच त्याचे आई वडील वारले आहेत. त्यामुळे त्याचा सांभाळ गावानेच केला. तो गावाची कामे करून पोट भरू लागला पहिल्या पहिल्यांदा तो शेताची राखण करी, पोरं सांभाळी, दुकानातून मसाले वाटून देई. जनावरांची राखण करी. शिवाय गावातील सर्व कार्यक्रमात तो पुढे असे.

काही दिवसांनी गावाला समजले की नथ्थूला जेवन चांगले करतो. तेथून पुढे त्याच्याकडे जेवनाचीच कामे येवू लागली. तोनेपुंसक असल्यामुळे बायकात मिसळल्यावर बायकांनाही काही वाटत नसे आणि पुरुषांनाही.

पण काही दिवसांनी त्याला आपला स्वत:चा व्यवसाय सापडल्या-सारखे झाले. तो तमाशात नाच्या झाला. कित्येक वर्षे तो तमाशाच्या फडातून नाचत फिरत राहिला. पण पुन्हा तो तीस बत्तीस वर्षाचा अनुभव घेवून गावात परत आला.

या तमाशाच्या मुशाफिरीनेच त्याला सिनेमाचा शोक लागला. आहे. सिनेमासाठी तो काहीही करायला एका पायावर तयार आहे. गावातले लोक विरंगुळा म्हणून त्याला लावणी म्हणायला लावत आणि तो अगदी पोझ घेवून लावण्या म्हणायचा.

तमाशामुळे जशी त्याला सिनेमाची सवय लागली तशीच सतत पानखाण्याचीही त्याला सवय लागली. चोवीस तास त्याच्या तोंडात पान असे. त्याला कोणी बाईने साधं सुपारीचं खांड आणि पानाचा तुकडा जरी दिला तरी तो तिची ढिगभर भांडी घासून देई. बायकांच्या बाळंतपणातही तो पुढे असे त्याला कुठली बाई लाजली तर तो म्हणे,

" काय माय चिके, मले सरमतं अवो तुमी तशा मी "[१७]

नथ्थुला त्याच्या असल्या जीवनाबद्दल काही वाटत नव्हते, नंतर तो बायकांच्या बरोबर शेतात काम करायला जावू लागतो आणि लवकरच आठ-दहा बायकांचे नेतेपद मिळवतो. शेवटी तो तेही काम सोडून पंजाबरावच्या घरात येवून राहू लागतो. पंजाबरावाच्या घरात त्याला मुलासारखी वागणूक मिळते. म्हणून लोक त्याला म्हणतात, " तुझ्या अवतार सार्थक झाला गड्या, नथ्थू वाळ्यावर नाहीतं बिरान्या मानसाले कोन वागीते असं त्येकरासारखं आजच्या जगात"[१८]

गावातील एक वेगळ्या जडणघडणीची व्यक्ती म्हणून नथ्थुला या कादंबरीत येतो.

क) गंपलास बुढा

सूर्यभान दगडूजी थोरात हा गावातील एक वृद्द गृहस्थ आहे. " गंपलास बुढा " हे त्याला गावाने दिलेले टोपण नाव आहे. हा बुढा गप्पा फार मोठ्या करायचा. हा एकदा गप्पा मारायला लागला की त्याला काळवेळाचे भान राहात नाही. एकदा चिकटला की चिकटला म्हणून गावाने त्याचे बारसं केले " गंपलास बुढा "

एकदा निवेदक " पंजाबराव " जेवूनखावून झोपण्यासाठी मळ्यात निघाला असताना गंपलास बुढा त्याला हटकतो. सुपारी खाण्यासाठी बोलावतो. तेव्हा त्याच्या " गंपलास " गप्पा सुरु होतात. या गप्पात तो पिकांच्या चोरीबद्दल बोलतो. डॉक्टरांच्या रंगेलपणाबद्दल बोलताना म्हणतो, " त काय सांगू राजा तुले डॉक्टरची रंगेली, निरा अंगाले हात लावाचेच घेतले पंधरा अन इलेक्शान दवादारु याले पंचीस. चाळीस रुपयेत येकटयानंच हळपले अन वर दवाया लिहून देल्ल्या सत्तर

रुपयाच्या"[१९] गंपलास बुढा गप्पा फार मजेशीर मारतो, सरकारी दवाखान्यात आपल्या म्हातारीला न्यायची नाही म्हणतो. कारण तिथून मुडदाच मागे आणावा लागतो. औषध घेण्यासाठी हाॅटेलात पाणी मागावे तर नाही, म्हणून सांगतात आणि चहा घेतल्यावरच पाणी देतात. अकोल्याला गेल्यानंतर आम्ही बुढा बुढीने सिनेमा पहिला हेही तो पंजाबला सांगतो. एस.टी.महामंडळ कसे उपकार केल्यासारखे एस.टया सोडतात. या एस.टया पेक्षा " परायव्हेट गाड्या" ब-या अशा प्रकारची अनेक विधाने गंपलास बुढा आपल्या गप्पात करतो. पंजाबरावाला तो " नातू " म्हणून संबोधतो..

वरील काही महत्वाच्या व्यक्तिरेखा कादंबरीत येतात.

समाजजीवनाचे चित्रण

प्रस्तु कादंबरीतील सामाजिक जीवन चित्रण पाहता तिला सामाजिक कादंबरी संबोधले पाहिजे. कादंबरीचे नाव आणि नायक यांच्यात एक संबंध आढळतो. मेड इन इंडिया म्हणजे भारतीय बनावट. या कादंबरीतील भारतीय बनावट कोणती ? तर नायक पंजाबराव याची झालेली जडणघडण. या नायकावर भारतीय समाजिकतेचा पुरेपूर प्रभाव असलेला दिसतो. असा नायकच भारतीय समाज विकृतीवर प्रकाश टाकू शकतो. त्याप्रमाणे नायक पंजाबराव ढासळत निघालेल्या भारतीय समाज संस्कृतीची लक्तरं आपल्या निवेदनातून मांडत जातो. समाजाच्या सर्व अंगोपांगाना तो स्पर्श करतो. तिथली विकृती उघडी करतो. मग ते राज-कारणाचे क्षेत्र असो, क्रिडा क्षेत्र असो, वैद्यकशास्त्र असो की सरकारी एस. टी.महामंडळ असो, शिक्षण संस्था असो. सर्व क्षेत्रातील घसरगुंडी तेथे उघडी पाडतो.

प्रस्तुत कादंबरीचा नायक पंजाबराव हा स्वत:च निवेदक असल्यामुळे त्यांच्या तोंडूनच कादंबरी उलगडत जाते· तोच राजकीय परिस्थितीवर भाष्य करतो· सामाजिक परिस्थिती स्पष्ट करतो, आर्थिक विषमतेवर भाष्य करतो· शैक्षणिक, एस· टी·महामंडळ, अधिकारी वर्ग यांचा भ्रष्टाचार कथन करतो·

सामाजिक परिस्थिती

पंजाबराव जरी आपल्या गावची सामाजिक परिस्थिती स्पष्ट करत असला तरी ही परिस्थिती प्रातिनिधिक ठरते· कारण भारत हा गरसोळीसारख्याच अनेक खेड्यांनी बनला आहे· गरसोळीवर टी·व्ही·, व्ही·डी· ओ·चा प्रभाव आहे· हा प्रभाव स्पष्ट करताना पंजाब म्हणातो, " सांप्रत टी·व्ही·वरच्या जाहिरातबाजीनं आमच्या समग्र गावाले भिन करुन सोडेल आहे· आता ईमल म्हनून कोनं कोनाले हाका मारल्या त वोन्ली ईमल लोकायले आठोते······कोनी कोनाले रस्त्यावर भेटलंत पयल्यंदा हाच इच्चार मनात येते की भला मेरीकमीजसे इसकी कमीज सफेद कैसी ?···"४० मांगीलाल शेठच्या कृपेने व्ही· डी·ओ· गावात आला आहे· त्यामुळे ढोरामागे फिरणा-या पोरांच्या तोंडात फक्त सिनेमातील डायलॉगच ऐकायला मिळतात· दहावी परीक्षेत नापास झालेल्यांनाही सिनेमाचे डायलॉग तोंडपाठ आहेत· मांगिलालशेठ कधी-कधी व्ही·डी·ओ·वर ब्ल्यू फिल्महीं दाखवतो· त्यामुळे निवेदक उपरोधिकपणे म्हणातो, " त्याकारने अखिल भारतीय ग्रामीण पातळीवरील लैंगिक शिक्षनाचा शुभारंभही ब्ल्यूफिलमच्या मध्यमातून अनायासे झालाच"४१ यामुळे छोटया छोटया मुलांना लैंगिक क्षेत्रातल्या एक दोन गोष्टी जास्त माहित झाल्या आहेत·

व्ही· डी·ओ बरोबरच मांगीलालशेठ मुळे म्हणाजे भांडवलशाहीमुळे गावात मटका, चक्रीजुगार यांचेही आगमन झाले आहे· या मटका जुगार मुळेच खेड्यांची खरी नासाडी झालेली आहे· एकेकाळी गावातील लोक

संध्याकाळी सात आठ वाजताच जेवून खावून गुडूप झोपी जात होते. याला फक्त भजनीमंडळेच अपवाद होती. पण आता शेठच्या मटक्याच्या सौजन्याने रात्री नवू वाजता येणारा ओपन ऐकल्याशिवाय शेतकरी जेवत नाहीत तर रात्री बाराला क्लोज आल्याशिवाय झोपत नाहीत. तसेच एके काळी पहाटे शुक्राच्या चांदणीला लोक शेतात नांगरायला जात. पण आता जात नाहीत कारण रात्री बाराला क्लोज ऐकून झोपलेले लोक सकाळी लवकर उठतील कसे ?

मांगीलाल शेठने गावात देशी दारूचे दुकान सुद्धा घातले आहे. त्यामुळे आणखी सामाजिक परिस्थिती बिघडलेली आहे. पूर्वी गावात गोकूळासारखे दुध दुभते असायचे पण आता हे दूध गावात न राहता थेट मुंबईला जाते. 'आन्देव भय्या आन्देव दुधाची पाईपलाईन टाकली कुना आलच्या भारतातून, तरी बंबई म्हंतेच्च की आन्देव होर और मंगता है गाववालो, येवढी मुंबईला दुधाची तहान आहे.

आणि गावात दूध नसल्यामुळे शेती करणाऱ्या जवळ शक्ती राहिलेली नाही. गावागावात एक दोन ट्रॅक्टर असल्यामुळे बैलांच्या संस्कृतीवर अतिक्रमण झालेले आहे. बैल मरेनात का तिकडे असे उद्गार निघतात. मटका जुगार खेळण्याचा नाद लागलेले शेतकरी दिवसातून एकदाच शेतात जातात ते म्हणजे सकाळी तांब्या घेवून. गावात टेलिफोन आला तो ही मांगीलाल शेठमुळेच. रतनखत्रीचा आकडा समजावा म्हणून.

मांगीलाल शेठ जितका गावाला लुबाडतो तितकाच गावही त्याला लुबाडतो. ते म्हणजे निवडणूकीच्या वेळी दर वेळी मांगीलाल शेठ निवडणूकीस उभा राहिला तोही गावकर्त्यांच्या आग्रहामुळे पण निवडून मात्र कधीच आला नाही. कारण गावकऱ्यांनी फक्त त्याला लुबाडलेच. मत मात्र कधी दिले नाही.

प्रस्तुत कादंबरीत जी राजकीय परिस्थीती आलेली आहे. ती सुद्दा प्रतिनिधिक आहे. गरसोळी खुर्दची सरपंचकी परंपरेने पंजाबराव पाटलांच्या घराण्यात चालत आलेली आहे. ज्याप्रमाणे गांधी घराण्याकडे " पंतप्रधानपद " राहिलेले होते.

गरसोळी गावापासून तीन मैलावरती वीज कारखाना आहे पण येथील लाईट सदा गेलेलीच. कारण म्हटले तर त्यातही राजकारण, गरसोळीत आपली मते नाहीत म्हणून.

अखिल राजकारणावर भाष्य करताना पंजाबराव म्हणतो, दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या साठी सरकारच्या योजना म्हणजे बर्लिनच्या भिंतीसारख्या - सर्व योजना मताचा विचार डोक्यात ठेवूनच.

अहमदनगरच्या दोस्ताला पंजाबराव पत्र पाठवतो त्यात तो गांधी मार्ग असा उल्लेख करतो तेव्हा त्याला प्रश्न पडतो आपण गांधी- मार्ग लिहिले खरे पण नेमका कोणता गांधी समजावा, " गांधी म्हन्जे महात्मा की इंदिरा की संजय की राजीव की सोनिया कि मेनका की प्रियंका"[४२] अशा रीतीने त्याने राजकीय घराणेशाहीवर प्रहार केला आहे.

क्रिकेटवर सुद्दा प्रस्तुत कादंबरीत काही भाष्य येते. पंजाबचा चिलम्या नावाचा दोस्त चेन स्मोकर आहे. पण अलीकडे त्याच्या हातात, सिग्रेट दिसत नाही, म्हणून पंजाब विचारतो, तर तो म्हणतो, जोपर्यंत इंड्यिा पाकिस्तानला शारजाह मध्ये हरवत नाही तोपर्यंत सिगारेट ओढणार नाही. यावर पंजाबरावचे भाष्य असे, " म्या मनात म्हटलं, कपिलदेवा, त्वा येकाले वाचवले, बुवा कॅन्सर पासून "[४३] इथे क्रीडा क्षेत्रातील घसरगुंडीवर प्रकाश पडतो. आऊट होवून सुद्दा आऊट न देणा-या गावातील टीमच्या अपप्रकाराबद्दल पंजाब म्हणतो,

" की सायाचा हा अंपायर काय पाकीस्तान रिटन होय काय लेक"[४४]

समाजातील वाढलेली भ्रष्टाचारी वृत्ती पोलिसांच्या आणि अधिकारी वर्गाच्या अनुषंगाने प्रस्तुत कादंबरीत चित्रित होते, पंजाबचा बुढा अधिकारी वर्गाला बोलावून पार्टी देतो. हा बुढा त्या अधिकाऱ्यांच्या बद्दल म्हणतो, मटन महाग झाले ते यांच्यामुळेच. हे फक्त खाण्यापिण्याच्याच गोष्टी लक्षात ठेवतात. बाकी सगळं विसरून जातात. कधीच मटन खात नव्हता तो ब्राम्हणसुद्धा मटन खावू लागला आहे .

गावात इतके अवैद्य धंदे आणि व्यवहार चालतात म्हणून गावात पोलिस नाहीत असे नाही. ते आहेत. पण त्यांचे हप्ते जोवर चालू आहेत तोवर ते कशाचीही चौकशी करीत नाहीत. हप्ते बंद झाले की ते जागे होतात.

मतदानातील भ्रष्टाचार पहा- एका मताला पन्नास रुपये पावशेर दारु आणि तिखट चिवडा. शिवाय ट्रॅक्टर गावात सोडायला पाठवून देवू असे उमेदवार सांगतात. पण न्यायला तेवढे येतात सोडायला मात्र येत नाही. भारताच्या भोंगळ लोकशाहीचे दर्शन इथे घडते.

अशा या भोंगळ लोकशाहीत नेते व्यासपीठावरुन मोठ्याने बोलत असतात की, " भारताने लोकशाही व्यवस्थेचा डोळसपणे स्वीकार केला असून सरंजामशाही आणि घराणेशाहीला केव्हाच मूठमाती देऊन या लोकशाहीची गोड फळे तळागाळातल्या माणसांपर्यंत पोहोचवली आहेत."[४५]

भारतात आर्थिक विषमता भरपूर आहे, पावलोपावली आहे. पैशा अडक्यांच सुख नाही, कपड्यालत्याचं, खाण्यापिण्याचं सुख नाही. दहा पैशाचं तेल सापडत नाही दोन वेळच्या जेवणासाठी आणि मग कुटुंबनियोजनासाठी चार आण्याचा फुगा कोठून आनतील ? कादंबरीत

दोन बातम्या दिलेल्या आहेत. पहिल्या बातमीत देवी पद्मावतीच्या शिरावर हि-यांचा मुकुट चढविण्याचा तिरूमल तिरूपती देवस्थानचा प्रस्ताव आहे. यासाठी आठ कोटी रूपये खर्च येणार आहे. दुसरी बातमी अशी: दारिद्र्याला आणि उपासमारीला कंटाळून एका कुटुंबाने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केली. या दोन्ही एकाच देशातील पण परस्पर विरोधी आहेत. इथे लेखकाला सामाजिक विषमता दाखवावयाची आहे.

आपल्या देशातील विषमता ठळक करताना पंजाबराव म्हणतो. व्हीएटनाम की थायलंड मला नक्की आठवत नाही पण तेथील पंतप्रधान सायकलवरून हिंडतो. आणि आपल्या देशात जे निवडून देतात त्यांच्या पायात कायमच्या टायरच्या चपला आणि जे निवडून जातात ते कायम डनलापच्या टायरवर.

देशातील शैक्षणिक परिस्थितीतर भयंकर आहे. स्वत: पंजाबराव आपले पेपर कोठे गेले आहेत हे शोधून काढून पैसे देवून पास झालेला आहे. आणि जे सुशिक्षित आहेत त्यांना नोक-या नाहीत. नैराश्याने ग्रासलेले असे तरूण दारू पिवून दिवस कंठत आहेत. खेड्यातल्या लोकांचा शिक्षणावरील विश्वासच उडालेला आहे ते आपल्या मुलांना शिकवायला तयार नाहीत.

आपल्या देशात मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोण चुकीचा आहे. मुलगी म्हणजे परक्याचे धन असा दृष्टिकोन असल्यामुळे लोक मुलगाच पाहिजे असा आग्रह धरतात. या हट्टापायी दहा-दहा मुली होतात. पण मुलगा झाल्याशिवाय थांबत नाहीत. अशा एका शिक्षकाचा किस्सा या कादंबरीत येतो. अत्यंत विनोदी पध्दतीने पंजाबरावने तो सांगितला आहे.

गाव आणि स्वच्छता याबद्दल बोलायला भाषा नाही दारातली गटारे स्वच्छ करा असं कुणी सांगितले तर उत्तर येते,

" अरे हैट! माझ्या दाठ्यात हाये माझ्या डायरा. तो मी काढून बुजवू ? पयले दुस-याचे बुजवा अन मंग मले म्हना"[४६]

शहरी लोकांची वृत्ती स्वार्थी असते. हे लोक आपल्यापुरते पाहतात. यावर भाष्य करताना पंजाब म्हणतो, " रात्री येकाच ताटात जेवून दुस-यादिवशी अजनबी होनारा हा माहोल काही आपल्यावर कलम होणार नाही.......याईले मालूम असते की आपुन अमुक साली रिटायर होऊ. अन भाऊ पंज्याब, अशी तीस वर्ष पुढे घडणारी गोष्ट आजच माहित असनं म्हन्जे भयानकच"[४७]

शहरातील लोकांच्यामध्ये एकीनसते याचे कारण सांगताना तो म्हणतो यांच्या व्यवसायात एकी नसते. म्हणून एकजण पाडेकरांच्या कवितेचे वर्गात समीक्षन करुन पोट भरत असतो तर दुसरा असतो. आइस्क्रीम पार्लरच्या गल्ल्यावर. यामुळे शेजारच्या माणसाची ओळख सुध्दा या लोकांना नसते.

अमरावतीच्या खानावळ चालवणा-या एका नातेवाईकाकडे गेल्यानंतर भिंतीवरील पदार्थांच्या किंमती वाचून पंजाबरावाला तेथे जेवण जात नाही. कारण आपण खाल्लेल्याचा हिशोब पाहुण्याने केला असेल असे उगीचच त्याला वाटते.

प्रस्तुत कादंबरीत येणारे जवीन दर्शन कधी ग्रामपातळीवरचे आहे. तर कधी देश पातळीवरचे. त्यामुळे या दर्शनास केवळ ग्रामीण जीवन दर्शन म्हणता येत नाही. स्तरबदलाच्या प्रक्रियेत असणा-या खेड्याचे हे जीवन चित्रण आहे.

कादंबरीची भाषा
------------

" मेड इन इंडिया" ची भाषा बहुरंगी आणि बहुढंगी आहे. अनेक क्षेत्रातील अनेक संदर्भ या भाषेत येतात. आणि कधी औपरोधिक

तर कधी प्रामाणीक, भोळसट निवेदनाचे सूर लेखकाने लावलेले दिसतात. या कादंबरीच्या निवेदनाचे माध्यम व-हाडी भाषा आहे. ही व-हाडी भाषा वरील प्रमाणे औपरोधिक नागमोडी वळणे घेत आलेली दिसते. त्यामुळे कादंबरीच्या वाचनात आनंद मिळतो. कादंबरीत कधी प्रमाण भाषेचा उपयोग केलेला आहे. तर कधी वृत्तपत्री बातम्यांचा. संस्कृत, हिंदी, इंग्रजी, या भाषेतील शब्दांची सरमिसळही या भाषेत आढळते. कादंबरीचा आशय लक्षात घेता तिची वैशिष्टयपूर्ण भाषा रास्त ठरते.

संवाद

प्रस्तुत कादंबरी प्रथमपुरुषी एकवचनी निवेदन पध्दतीने कथन होत असल्याने त्यामध्ये प्रत्यक्ष संवादाचा भाग अत्यल्प आहे. काही ठिकाणी अप्रत्यक्ष संवाद येतो पण तोही निवेदकाने वैशिष्टपूर्ण रीतीने कथन केलेला आहे. कादंबरीचा नायक-निवेदक पंजाबराव निवेदन करता-करता गावक-यांचे संवादही त्यांच्या भाषेची नक्कल करीत सांगतो. त्याचे हे संवाद कथन पहा :

" या कारने सदर हिंदू हॉटेलात सदोदित मुसलमानाईचेच प्रभुत्व दिसते आता या लक्षणामुळे ही ते धर्मनिरपेक्ष ठरते.... हौर भाऊ, कायदेके रुलमेइच ऐसा हे के तुम कित्ता भी करो कित्ता भी करो, मगर बँकोके कर्जे तुमकू कभी ना कभीतोभी च्युकते करनाईच पळते... अशा सारखे विदग्ध संवादही वेळोवेळी या हॉटेलच्या माध्यमातून येना-याजाना-याईच्या जनरल नॉलेजमध्ये भर घालतात.....अजी अब्बा-मिया तो भी मैने उस्मानकू भोत-भोत समज्यायाकी वो शालीगराम पटेल भोतीच्य सरका हुवा आदमी है.....उसे मत खुज्या"४८

वरील उता-यातील अधोरेखित केलेली वाक्ये निवेदकाची आहेत. आणि अधोरेखित केली नसलेली गावक-यांच्या संवादाची निवेदने आहेत अशा प्रकारचे अप्रत्यक्ष संवाद प्रस्तुत कादंबरीत काही ठिकाणी येतात.

एका ठिकाणी लेखकाने, नाटकातील संवाद तंत्राचा वापर केलेला आहे. गावातील लग्नसमारंभास आलेले लोक कसे दारू पिवून तरऽऽ होतात. त्यांची कशी अवस्था झालेली असते. याचे चित्रण करणाऱ्या प्रसंगासाठी हे तंत्र वापरले आहे. पात्रांच्या नावांची आणि नाटय-तंत्रातील कंसातील सूचनांचा जो भाग असतो. त्यांना संक्षिप्त स्वरूपात मांडून त्यांची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. रू.पा: दा. पा: म्हणजे रूपाजी पाटील म्हणाले, दादाजी पाटील म्हणाले किंवा कंसातील सूचनांचे संक्षिप्त रूप पहा :

" ( दा.पा. पुन्हा ख. हा)"

याचा अर्थ 'दादाराव पाटील पुन्हा खलखल हालवत.'

पाहुणीबाईचा इतिहास कथन करताना अप्रत्यक्ष संवाद विस्तृत प्रमाणात आलेला आहे.

मुख्यता " वऱ्हाडी भाषा " माध्यम म्हणून वापरलेल्या या कादंबरीत अनेक ठिकाणी प्रमाण भाषेचा वापर केलेला आढळतो. नायक पंजाबराव वऱ्हाडी बोलता-बोलता मधेच, " इलेक्शानबाजीत. एका उदात्त देदीप्यमान कल्पनेचं आपण केलेल एक सार्वोत्कृष्ट विडंबन.जगात तोड नसेल या विडंबनाला. या निवडणूकीसारख्या मुजोर-लोलूप प्रकारात म्हणून मला रस नाही......"४९ असे प्रमाण भाषेत बोलतो. किंवा पृष्ठ क्र. ६२ ते ६५ या चार पानावर येणारी आकाशवाणीवरील दीर्घ कविता प्रमाण भाषेत येते.

याशिवाय हिन्दी भाषा, इंग्रजी भाषेतील काही अवतरणे सुद्दा असणे हे या कादंबरीचे वैशिष्टय ठरते.

उदा. रेडिओवरील कॉमेन्ट्रीचे विडंबन पृ. १०८ वर येते पहा.-

" इम्रानखानकी ये पहयली गेंद पी पंज्याबको और पी पंज्याबने उसे उठा दिया है लॉंग ■ ऑफ के उपरसे छे रनके लिये "५०

सरपंच झाल्यावर दुसऱ्याच वर्षी पंजाबरावचा बुढा त्याचे लग्न लावून देतो तेव्हा पंजाब म्हणतो -

" ....and the lord God said that, it is not good that the man should be alone"51

अशा प्रकारचे इंग्रजी उतारे दोन तीन ठिकाणी या कादंबरीत येतात

तसेच " मेड इन इंडिया" मध्ये एकूण सहा ठिकाणी वृत्तपत्रीय बातमी लेखनाचा उपयोग केलेला आहे. लेखक स्वतः पत्रकार असल्यामुळे हा मोह आवरला नसावा पण अत्यंत चांगल्या पध्दतीने बातमी लेखनाचा वापर लेखकाने केला आहे. वस्तुतः देशात लोकशाहीचे धिंडवडे निघत असतात पण वृत्तपत्रीय बातम्या मधून मात्र, " घराणे शाहीला केव्हाच मूठमाती देऊन या लोकशाहीची मधूर फळे तळागाळातल्या सर्व-सामान्य माणसापर्यंत पोचली आहेत"५२ असे खोटेच सांगण्यात येते हा विरोधाभास स्पष्ट करण्यासाठी लेखक बातमीचा सुरेख वापर करतो.

बुढयाची प्रसिध्दीची हाव स्पष्ट करणारी एक बातमी आहे. त्यामध्ये अधिका-यांना विचित्र नावे देवून त्यातून भ्रष्टाचारावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ती बातमी म्हणजे, " गुरसोळी खुर्द येथे नळयोजना कार्यान्वित"५३ या बातमीतील अधिका-यांची नावे पहा, दे.भ.हपापाचा माल गपापा, श्री.क.बा. सूरसाहेब, मा.भोपंजीराव अशा नावातून एखाद्या योजनेत जो भ्रष्टाचार असतो त्याकडे निर्देश केलेला आहे.

वृत्तपत्रातील काही बातम्या अत्यंत अनाकलनीय असतात. एका बातमीआधारे त्याचाही समाचार लेखकाने घेतला आहे. देशातील आर्थिक विषमतेवर प्रकाश टाकण्यासाठी लेखकांनी बातमीचाच आधार घेतला आहे.

पहिल्या बातमीत पद्मावती देवीच्या शिरावर आठ कोटी रुपयांचा मुकुट बसणार असल्याची माहिती आहे. तर दुस-या बातमीत

एका पस्तीस वर्षीय युवकाने बेकारी व दारिद्र्याला कंटाळून आत्महत्या केल्याची माहिती आहे. या दोन बातम्यातून सामाजिक विषमता स्पष्ट होते. अशा प्रकारे बातमी लेखनाचा उपयोग कादंबरीकाराने केलेला दिसतो.

कादंबरीचा नायक हा अभिरूची संपन्न आहे, त्याला रेडिओ ऐकायला आवडतो, त्यावरील काव्य वाचन, विविध भारती, श्रीलंका केंद्रावरील गाणी तो आवडीने ऐकतो. क्रिकेट त्याचा आवडता खेळ आहे. सिनेमा पाहणेही त्याला आवडते. तो चांगला वाचक आहे. आणि कवीताही करतो. शेर-शायऱ्या त्याच्या मुखोदगत् आहेत. या सर्व आवडीनिवडीचा संदर्भ सतत या कादंबरीत येत राहतो. हा सुध्दा या कादंबरीच्या भाषेचा एक विशेष ठरतो.

## म्हणी, वाक्प्रचार आणि संस्कृत, हिंदी, इंग्रजी भाषेतील शब्द

प्रस्तुत कादंबरीत वैदर्भी वाक्प्रचार म्हणींचा पुष्कळ वापर झालेला आहे. त्यांचे स्वरूप पाहू.

### म्हणी

१. बोलनं राईराई अन चुकाची चव नाही
२. धांडा धुन्डा खाये अन हल्या संड राहये
३. खायाले आलो रे कामाले मेलो रे
४. हळ्याच्या सापानं काही गाई मरत नाहीत
५. सांगतो लोकाले अन् शेंबूड माझ्या नाकाले
६. रान जयते त जन पाहयते, मन जयते त कोन पाहयते ?
७. मनी नाही नांदणा अन दिवाईत चान्न
८. हजाराले भारी अनशंभराले गोटे मारी
९. काम पळे बाका तो गधेकू बोले काका
१०. याच्या त्याच्यावर भागे त मंग नवरा काहाले लागे ?

११· दाळ्ठा उधळा अन न्हानीले बोया

१२· नोट करे गोठ अन चिल्लर करे इन्चार

१३· गळ्यात पके अन वाजोन घले

१४· पृ·१३४, १३५ वर वेगवेगळ्या देशांना लेखकांनी म्हणींची टोपण नावे दिली आहे· उदा· अमेरिका - हत्ती चाले तोलानं कुत्रे भूकती जो-यानं, पाकिस्तान - सतरा नवरे एकाले ना आवरे इ· म्हणींचा वापर या कादंबरीत झाला आहे·

वाक्प्रचार

आता काही निवडक वाक्प्रचार पाहू - बुटाले अत्तर, येलाले बेल ना, डोक्याला डोक्स लावलं, सात खाऊन पाचाची भूक बहाल, माय द्या लागते अन मावशी घ्या लागते· उंबराचं फूल, ना येलाले दु:ख ना वायकाले दु:ख-असे अनेक प्रकारचे वाक्प्रचार या कादंबरीत येतात·

संस्कृत शब्द

जलप्रपात, चराचरावर, अविरत, उदक, तत्सम, तीर्थस्पर्श, अनिभिषिक्त, अध्वर्यु, बाहुअस्थिभंग, श्रोतावृंद, असे संस्कृत शब्द कादंबरीच्या सुरुवातीला येतात·

हिन्दी-इंग्रजी शब्द

इस्तेमाल, मुआईना, उदरी, मुनाफा, तरोताजा, अलाहिदा, अर्मानिन, अलमस्त, असे हिन्दी शब्द तर शिस्टिमच, सनबाथचा थी येन्ड, हायफाय साऊंड, रिले, अन्सरे, मिसाईल, कॉम्प्रमाईज, ओव्हर कॉन्फिडन्स, नॉर्मल, ग्रेटच, रिप्लायड्‌ लिव्ह, असे इंग्रजी शब्द प्रस्तुत कादंबरीत अधून मधून येत राहतात·

व-हाडी भाषेतील शब्द अडगार ही अडचण लक्षात घेवून

लेखकाने परिशिष्टा मध्ये अवघड शब्दांचे अर्थ देवून ठेवले आहेत. या शब्दकोशात, धुरळा, उलाय, अथुल्ली, हिंदानाने, मुंडाल, अग्यारी अशा अवघड शब्दांचे अर्थ दिलेले आहेत.

कादंबरीतील काही विसंगती.
------------------------------

प्रस्तुत " मेड इन इंडिया" ही कादंबरी वाचताना हास्याची कारंजी फुटतात कारण पदोपदी नर्म विनोद भेटतो, हा नर्म विनोद अतिशयोक्त आणि उपरोधपूर्ण आहे. या कादंबरीच्या गुणांना जमेस धरले तरी या कादंबरीत काही ठिकाणी विसंगती पूर्ण निवेदन येते. त्यामुळे कादंबरीच्या आस्वादामध्ये अडथळे येतात. उदा. कादंबरीच्या उत्तरार्धात पंजाबरावाचे ऑपरेशन होते. जबडा फाडून कानाचे ऑपरेशन केल्यामुळे तो म्हणतो मला बोलताही येत नव्हते पण लगेच पुढे म्हणतो," येकं दिवस थाळाशी झिट्टमझिट्टी होताच आखरीले त्या डॉक्टरनं कात टाकली"[५४] बोलायला न येणारा पंजाबराव डॉक्टरांशी भांडतो कसा काय ? हा प्रश्न पडतो आणि काहीशी विसंगती असल्याचे लक्षात येते.

किंवा पा.नं.१४४ वर पंजाबराव म्हणतो," मंग गावात नुस्त येक कवेल्लक घर, अन घरात आई, केदार काखीत पोराले घेऊन बायको अन् नथ्थू येवढेच उरलो"[५५] असा हा कंगाल झालेला पंजाबराव पैशासाठी महाग झालेला असतो. पण पुढे अचानक निवेदन असे आहे की...." त मंग म्या माझ्या आदी अंत विस्मरून गावात दकालकन् किराण्याचं दुकान खोललं". यासाठी तो पैसा कोठून आणतो याचा तपशील देत नाही. दयावा अशी अपेक्षा नाही पण. कादंबरीच्या उत्तरार्धात अशा विसंगतींची संख्या वाढत गेलेली आहे त्यामुळे रसभंग होतो.

अशा विसंगती शिवाय काही ठिकाणी विषयांतरे, अतिशयोक्ती-पूर्ण वक्तव्ये, विस्कळीतपणा, असे काही दोष कादंबरीत आढळतात. शेवटी होणारी पंजाबरावाची शोकांतिका केवळ अकारण आणि शोकांतिकेसाठी शोकांतिका केल्याचे वाटते. पंजाबराव उपचारासाठी एकवर्ष मुंबईला गेल्याच्या काळात न पटतील इतक्या वेगाने घटना घडतात. शेत नापिक होणे, त्या दुःखाने बुढा व्यसनी होणे, शेतीच्या खर्चात बुडणे, आणि चाळीस एकरापेक्षा जास्त शेती सट्टयात हरणे या घटना तपशीलाविना पटत नाहीत. त्यामुळे कादंबरीचा शेवट कृतक वाटतो. वरील दोष नसते तर कादंबरीची गुणवत्ता अधिक वाढली असती.

## समारोप

अशा प्रकारे -" मेड इन इंडिया " - ही कादंबरी काहीशी त्रुटित असली तरी ती आधुनिक ग्रामीण भारता बद्दलचे उत्तम भाष्य ठरते. अनेक वृत्ती प्रवृत्ती, आणि विकृती या विषयात पकडल्या गेल्या आहेत. संमिश्र भाषा वापरून जणू " भारतच विसंगत असल्याचे लेखकाने सूचीत केले आहे. अशा या कादंबरीवर कथानक, व्यक्तीचित्रण, जीवनदर्शन भाषाशैली अशा अंगानी प्रकाश टाकला. या अभ्यासात भालचंद्र नेमाडे यांच्या " कोसला " कादंबरीचा काही प्रमाणात प्रभाव असल्याचे सूचित केले.

संदर्भ

१· सारडा, शंकर : ग्रंथविशेष
मेहता पब्लिशिंग हाउस पुणे, आवृत्ती पहिली
१९९१, पृ· ३७

२· तत्रैव पृ· ३३
३· तत्रैव पृ· ३३
४· ठाकूर र·ना· मराठी ग्रामीण कादंबरी
मेहता प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती पहिली, १९९३
पृ·१३०
५· बोरकर पुरुषोत्तम : मेड इन इंडिया
श्रीविद्या प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली १९८७,
पृ·३

६· तत्रैव पृ· १४७
७· तत्रैव पृ· १
८· तत्रैव पृ· २
९· तत्रैव पृ·८
१०·तत्रैव पृ· ६
११·तत्रैव पृ· ४६
१२·तत्रैव पृ· ४८
१३· तत्रैव पृ· ६५
१४·तत्रैव पृ· ४४
१५· तत्रैव पृ· ६१
१६·तत्रैव पृ· ४७
१७·तत्रैव पृ·१०५
१८· तत्रैव पृ· ११७
१९· तत्रैव पृ· ३

२०. तत्रैव पृ. ४६

२१. तत्रैव पृ. ४८

२२. तत्रैव पृ. ८१

२३. तत्रैव पृ. १०७

२४. तत्रैव पृ. १०९

२५. तत्रैव पृ. ४३

२६. तत्रैव पृ. ३६

२७. तत्रैव पृ.८७

२८. तत्रैव पृ. ४

२९. तत्रैव पृ. ६

३०. तत्रैव पृ. ९

३१. तत्रैव पृ. १२

३२. तत्रैव पृ. १३

३३. तत्रैव पृ.१५

३४. तत्रैव पृ. ३४

३५. तत्रैव पृ. १४४

३६. तत्रैव पृ. १७

३७. तत्रैव पृ. ६०

३८. तत्रैव पृ.६१

३९. तत्रैव पृ. ८४

४०. तत्रैव पृ. १४१

४१. तत्रैव पृ. २४

४२. तत्रैव पृ. १४०

४३. तत्रैव पृ. १३३

४४. तत्रैव पृ. १४०

४५. तत्रैव पृ. ३०

४६. तत्रैव पृ. ३६

४७. तत्रैव पृ. ४७

४८· बोरकर पुरुषोत्तम : मेड इन इंडिया, उ· नि·पृ·१६

४९· तत्रैव पृ·३

५०· तत्रैव पृ· १०८ /१०९

५१· तत्रैव पृ· १४२

५२· तत्रैव पृ· ५

५३· तत्रैव पृ· १०

५४· तत्रैव पृ· १४३

५५· तत्रैव पृ· १४४